महाराष्ट्र शासन
**ग्राम विकास विभाग**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**
४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
Website-https://mahaawaas.com
दूरध्वनी क्र.०२२-२७५६१८२४ / हेल्प लाईन क्र. १८०० २२ २०१९ Email ID-directoriayruralhousing@gmail.com

जा.क्र./कावि/तक्रार अर्ज/PMAY-G-१/८७९/२०२३ दिनांक -२६/०६/२०२३

प्रति,
प्रकल्प संचालक,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, रत्नागिरी.

**विषय : मौजे बाणकोट, ता.मंडणगड येथील घरकुलांची चौकशी करणेबाबत.**
संदर्भ : अवर सचिव, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील पत्र क्र.प्रआयो-२०२३/प्र.क्र.०२/यो-१० दि.२९.०५.२०२३

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, श्री. दिनेश बाळकृष्ण पवार, रा.कुलाबा, मुंबई यांचेकडील तक्रार अर्ज या कार्यालयास प्राप्त झाले असून सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

या अनुषंगाने आपल्या स्तरावर नियमोचित कार्यवाही करुन, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अर्जदारास परस्पर कळविण्यात यावा व त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी, ही विनंती.

सोबत - वरिलप्रमाणे

**(नीलेश काळे)**
**उपसंचालक**
**राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण**
**महाराष्ट्र राज्य**

**प्रत :-** १. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,रत्नागिरी यांना माहितीस्तव.
२. अवर सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन यांना माहितीस्तव.

राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य
आवक क्रमांक - 1086-4528.2.23
आवक दिनांक - 20-06-23
शाखा -
प्रति, सह संचालक (लेखा) -

मा. उप मुख्यमंत्री कार्यालय
ई-ऑफीस क्र. : 5792912
दिनांक : 28/03/23

श्री. दिनेश बाळकृष्ण पवार
C/o. नरेश जाण्या कुलापकर
३६५/५,शिवशास्त्री मच्छीमार नगर,
कॅपटन प्रकाश पेठे मार्ग, कफ परेड,
कुलाबा, मुंबई - ४००००५
दिनांक : १५/०२/२०२३

प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद तथा अध्यक्ष कार्यकारी समिती,
जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा,
जि. रत्नागिरी - ४१५६१२

प्रा.वि. व ग्रा.वि. (ना.शा.) ग्रामविकास
कार्यासन क्र. ग्रा-१०
दिनांक : 24/4/23
नस्ती क्र. 4834

**विषय :- मौजे बाणकोट, ता. मंडणगड येथील घरकुलांची चौकशी करणेबाबत.**

**संदर्भ :-** १) आपले पत्र क्र. ४१३६/१६ दिनांक ०९.१२.२०१६
२) माझा दि. ३० जुलै, २०२० चे पत्र.
३) मा. प्रकल्प संचालक यांचे पत्र क्र.९७६ दि.१८.०८.२०२०
४) मा. गट विकास अधिकारी यांचे पत्र क्र. २३२९ दि. १७.०९.२०२०
५) माझे दि. ०१/०२/२०२१ चे पत्र.
६) तहसिलदार सर्वसाधारण, जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांचे पत्र क्र.ससाशा/ जीबी-एल-४/४३७३/२०२१ दिनांक १०.०२.२०२१
७) माझे दि. ०९/१२/२०२१ चे पत्र.
८) मा. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जि.प.रत्नागिरी यांचे पत्र क्र. १५६ दि. ०१.०२.२०२२
९) मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं), जि. प. रत्नागिरी याचे पत्र क्र. ४३४७ दि. ०५.०८.२०२२ व क्र. ५४३७ दि. २८.१०.२०२२

मा. महोदय,

श्रीमती इंदुबाई काशिराम खैरे, श्रीमती पिठूबाई विनायक तांबे यांची घरे पक्की असता त्यांना घरकुल बांधण्यासाठी मंजूरी दिलेली आहे. तसेच श्री. देवराम गोविंद शिर्के व या दोंन्ही लाभार्थ्यांनी घराचे बांधकाम चटई क्षेत्र किमान २६९ चौ.फुट असायला पाहिजे असता त्यांनी तसे न करता पडव्या बांधल्या आहेत. आपण दिलेल्या प्रशासकीय मंजूरी मध्ये रु. १ लाख अनुदानाची मंजूरी असता श्रीमती. इंदुबाई काशिराम खैरे यांना रु. १,२०,०००/- अनुदान वितरीत केलेले आहे. मा. गट विकास अधिकारी, ग्रामसेवक, शाखा अभियंता / कनिष्ठ अभियंता व पंचायत समितीचे नियमित शाखा अभियंता यांनी आदेशामध्ये नमूद केलेल्या अनु. क्र. १ ते २३ अटीशर्ती पुरावे, नियम यांचे पालन केलेले नाही, तसेच मा. गट विकास अधिकारी, पं.स.का. मंडणगड यांनी पाठविलेला अहवाल मला अमान्य असून दिशाभूल करणारा आहे, ज्या अधिकाऱ्याने, कर्मचाऱ्याने चुकीचा, दिशाभूल करणारा अहवाल तयार केला आहे अशा सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यावर आपल्या स्थरावर योग्य ती तपासणी, चौकशी करुन चौकशीत दोषी आढळून आल्यास संबंधितांवर शासन नियमानुसार योग्य ती दंडात्मक कारवाई करावी ही विनंती असे संदर्भ क्र. २, ५ व ७ च्या अर्जान्वये आपणास कळविणेत आलेले आहे.

मा. तहसिलदार सर्वसाधारण, जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांनी आपणास सदर विषयाबाबत तक्रार अर्जातील मुदयांबाबत आपले स्थरावरुन योग्य कार्यवाही करुन सबंधितास

परस्पर कळविणेत यावा व त्याची प्रत या कार्यालयास सादर करणेत यावी या बाबत संदर्भ क्र. ६ च्या पत्रान्वये कळविले आहे.

संबधित तत्कालीन ग्रामसेवक यांची विभागीय चौकशी व ग्रामपंचायत स्तरावर पर्यवेक्षण करणारे तत्कालीन अधिकारी यांची कायमस्वरुपी एक वेतनवाढ रोखून धरण्यात यावी असे मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जि.प. रत्नागिरी यांना संदर्भ क्र. ८ च्या पत्रान्वये मा. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जि.प.रत्नागिरी यांनी कळविले आहे.

सन २०११-१२ मधील लाभार्थीच्या असेसमेंट उताऱ्यामध्ये त्यांचे पक्के घर दगडविटाचे, चुना किंवा सिमेंटचे पक्के घर असे मालमत्तेचे वर्णन असून अर्थात त्यांचे पक्के घर असून देखील संबधीतांना सन २०१६-१७ मध्ये घरकुल कसे मंजूर करण्यात आले, याबाबतची चौकशी करण्यात यावी सदर प्रकरणी प्रत्यक्ष काम व दप्तराची पडताळणी, चौकशी करणेत यावी व चौकशीअंती संबधीत ग्रामसेवक दोषी आढळून आल्यास त्यांचेवर महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ नुसार कारवाई करण्यात यावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करणेत यावा, सदर प्रकरणी विलंब होणर नाही याची दक्षता घेण्यात यावी असे मा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मंडणगड यांना संदर्भ क्र. ९ च्या पत्रान्वये मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं), जि. प. रत्नागिरी यांनी कळविले असून सुध्दा सहा महिन्याचा कालावधी उलटून गेला तरी त्यांच्याकडून अद्याप कारवाई करण्यात आलेली नाही.

त्यानुसार आपणास कळविणेत येते की, सदर विषयाबाबत आपल्या स्थरावर कामाची प्रत्यक्ष पहाणी, दप्तराची पडताळणी, व चौकशी करुन स्वतःच्या नावे पक्के घर असतांनाही ज्यांनी शासनाची दिशाभूल, फसवणूक करुन घरकुलाचा लाभ घेतला आहे आणि प्रशासकिय आदेशामध्ये नमूद क्र. १ ते २३ अटीशर्ती पुरावे, नियम यांचे उल्लंघन करुन संबधितांना घरकुलाचा लाभ मिळवून दिला आहे असे त्यावेळेसचे मा. गट विकास अधिकारी, ग्रामसेवक, शाखा अभियंता / कनिष्ठ अभियंता व पंचायत समितीचे नियमित शाखा अभियंता यांचेवर शासन नियमानुसार योग्य ती दंडात्मक कारवाई करावी व केलेल्या कारवाईच्या अहवालाची सहीसूद नक्कलेची प्रत मला वरील दिलेल्या पत्त्यावरती अथवा माझ्या dineshpawar076@gmail.com या इमेल आयडीवर पाठविण्यात यावी अशी आपणास पुंन्हा या पत्राव्दारे विनंती करीत आहे. आपणाकडून सहकार्याची अपेक्षा आहे. जर का आपणाकडून कोणतीच कारवाई केली गेली नाही तर रिट पेटिशन (कोर्ट केस) दाखल करण्यात येईल याला आपण स्वतः जबाबदार रहाल मी जबाबदार राहणार नाही याची आपण नोंद घ्यावी हि विनंती.

आपला विश्वासू

**श्री. दिनेश बाळकृष्ण पवार**
**मो.नं. - ९६१९५१४८३०**

**प्रतः-**

**मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांना** कळविणेत येते की, सदर विषयाबाबत त्यांच्या स्थरावर कामाची प्रत्यक्ष पहाणी, दप्तराची पडताळणी, चौकशी व तातडीने कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची सहीसूद नक्कलेची प्रत मला रजिस्टर पोस्टाव्दारे अथवा माझ्या dineshpawar076@gmail.com या इमेल आयडीवर पाठविणेबाबत

आपण **मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,** जिल्हा परिषद तथा अध्यक्ष कार्यकारी समिती, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा यांना आपल्या स्थरावर सुचना / आदेश देण्यात यावेत अशी आपणास विनंती करीत आहे. आपणाकडून सहकार्याची अपेक्षा आहे.

**प्रत माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर :-**

१) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई

२) मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई

३) मा. मंत्री, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

४) मा. पालकमंत्री (रत्नागिरी) कोकण विभाग, मंत्रालय, मुंबई

५) मा. कोकण विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई

६) मा. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, रत्नागिरी